ePaper

| वर्ष - 6 । अंक - 237 || UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | ।रविवार ।दिनांक 11 डिसेंबर 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# चिंचवडला 'क' वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा!



## आतील पानांत


- आपली विचारसरणी जीवनाची स्थिती आणि दशा ठरवते!
- "रनिंग ॲबिलिटी ऑफ बुल्स रिपोर्ट" निर्णायक ठरेल!
- "आपणही होता अडीच वर्षे, काय केलं सीमाप्रश्नाचं?


## चिंचवडमध्ये चंद्रकांत पाटील यांचे महापुरूषांबद्दल आक्षेपार्ह्य वक्तव्य

# चंद्रकांत पाटील यांच्यावर 'शाईफेक'!

## माझ्यावर झालेली 'शाईफेक' हा भ्याडपणा : चंद्रकांत पाटील

।पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

राज्यात अभूतपूर्व गोंधळ सुरु आहे. त्यातच राजकीय मंडळींकडून वादग्रस्त विधानांचे सत्र सुरु आहे. या सर्वादरम्यान काल भाजप मंत्री चंद्रकांत पाटील यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले आणि कर्मवीर भाऊराव पाटील यांच्याबद्दल वादग्रस्त विधान केले होते. या विधानामुळे विरोधक चांगलेच आक्रमक झाले होते. त्यांनतर आज देखील या विधानाचे पडसाद आज सर्वत्र दिसून आले आहे. दरम्यान, पुणे दौऱ्यावर असताना पिंपरी- चिंचवड येथे भाजप मंत्री चंद्रकांत पाटील यांच्यावर शाईफेक करण्यात आल्याची घटना समोर आली आहे. पोलिसांनी समता दल, वंचित बहुजन आघाडीच्या कार्यकर्त्यांना अटक केली आहे.

चंद्रकांत पाटील पिंपरी-चिंचवडमध्ये मोरया गोसावी महोत्सवासाठी पिंपरी चिंचवडमध्ये आले होते. ते पिंपरी चिंचवडमध्ये आपल्या एका कार्यकर्त्याच्या घरी थांबले होते. कार्यकर्त्याच्या घरून निघाल्यानंतर चंद्रकांत पाटील यांच्यावर शाईफेक करण्यात आली आहे. या प्रकरणात तीन जणांना पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे.



### हिंमत असेल तर समोर या – चंद्रकांत पाटील



पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा फुले यांच्याबाबत केलेल्या विधानानंतर विरोधकांकडून त्यांच्यावर टीकेची झोड उठवण्यात येत आहे. दरम्यान, आज त्यांच्या वक्तव्याचा निषेध करत पिंपरी-चिंचवडमध्ये अज्ञात व्यक्तीकडून त्यांच्यावर शाईफेक करण्यात आली. दरम्यान, या घटनेनंतर चंद्रकांत पाटील यांनी माध्यमांना प्रतिक्रिया दिली. माझ्यावर झालेली शाईफेक हा भ्याडपणा असून हिंमत असेल तर समोर या, असे आव्हान चंद्रकांत पाटील यांनी दिले आहे.मी चळवळीतला माणूस आहे. मी कोणाला घाबरत नाही. अशा प्रकारे पराचा कावळा करणं, योग्य नाही. मी केलेल्या विधानाचा विपर्यास करण्यात आला आहे. मी त्यावर तीनवेळा स्पष्टीकरणही दिलं आहे. तरीही अशाप्रकारे भ्याडपणे माझ्यावर शाईफेक करण्यात आली आहे.

### तिघांना अटक; कोण आहेत हे आरोपी?

भाजपा नेते चंद्रकांत पाटील यांच्यावर शाईफेक झाल्यानंतर चिंचवड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. मनोज भास्कर घरबडे ( समता सैनिक दल संघटक), धनंजय भाऊसाहेब इजगज (समता सैनिक दल सदस्य) आणि विजय धर्मा ओव्हाळ (वंचित बहुजन आघाडी) यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आल्यानंतर अटकेची कारवाई करण्यात आली आहे.



### चंद्रकांत पाटील यांचा ताफा आडवण्याचा प्रयत्न...

महापुरुषांबद्दल केलेल्या बदनामीकारक वक्तव्याबद्दल आज महाराष्ट्र राज्याचे उच्च शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांना महाराष्ट्र प्रदेश व पुणे जिल्हा विद्यार्थी काँग्रेस NSUI च्या वतीने काळे झेंडे दाखवून त्यांचा ताफा आडवण्याचा प्रयत्न चिंचवड स्टेशन येथे करण्यात आला.

यावेळी महाराष्ट्र प्रदेश विद्यार्थी काँग्रेसचे उपाध्यक्ष अँड. उमेश खंदारे, पुणे जिल्हाध्यक्ष भूषण रानभरे, सोशल मीडिया अध्यक्ष अभिजीत हळदेकर, महाराष्ट्र प्रदेश विद्यार्थी काँग्रेसचे प्रवक्ते अविनाशजी सोळुंखे, पिंपरी चिंचवड NSUI चे अध्यक्ष डॉ. वसीम इनामदार, सोहेल लांडगे, रवी म्हेत्रे, प्रसन्न मोरे, अजिंक्य हळदेकर व कार्यकर्ते उपस्थित होते.

# पुण्यात राष्ट्रवादी काँग्रेसचे आंदोलन!

## पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या आक्षेपार्ह विधानाच्या निषेध




पुणे ।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**चंद्रकांत पाटील यांच्या ऑफिससमोर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन करण्यात आले.**

भाजपचे नेते मंत्री चंद्रकांत पाटील यांनी काल एका कार्यक्रमा दरम्यान कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा जोतिराव फुले यांनी शाळा सुरु केल्या.शाळा सुरु करताना त्यांना सरकारने अनुदान दिलं नाही.तर त्यांनी लोकांकडे भीक मागितली. शाळा चालवतोय, पैसे द्या. तेव्हाच्या काळात १० रुपये देणारे लोकं होती.आता १०/१० कोटी रुपये देणारे लोक आहेत.असे विधान केल्यानंतर राज्यातील विविध राजकीय पक्षातील नेते आणि संघटनांचे प्रतिनिधी आक्रमक झाले असून आज पुण्यातील कोथरूड येथील चंद्रकांत पाटील यांच्या ऑफिससमोर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन करण्यात आले.

यावेळी प्रशांत जगताप म्हणाले की, भाजप नेत्यांकडून सतत महापुरुषांबद्दल वादग्रस्त विधान केली जात आहे.त्या नेत्यावर भाजप श्रेष्ठीकडून कोणत्याही प्रकारची कारवाई होताना दिसत नाही.त्याच दरम्यान आता भाजपचे नेते मंत्री चंद्रकांत पाटील यांनी ज्या महापुरुषांनी आपल्या सर्वासाठी शिक्षणाची दार खुली केली.त्यांच्याबद्दल विधाना केल आहे.आम्ही त्या विधानाचा तीव्र शब्दात निषेध व्यक्त करित असून मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांनी चंद्रकांत पाटलांची मंत्रिमंडळामधून हकालपट्टी करावी अशी आमची मागणी असल्याच त्यांनी सांगितले.

# पुण्यात ५१ पादचारी सिग्नल बसविण्याचा प्रस्ताव धूळखात

## महापालिकेची पादचाऱ्यांबाबत असलेली असंवेदनशीलता स्पष्ट

पुणे ।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**शहरातील वर्दळीच्या रस्त्यांवर ५१ ठिकाणी पादचारी सिग्नल बसविण्यासाठीच्या खर्चाला महापालिकेच्या वित्तीय समितीने अद्यापही मान्यता न दिल्याने हा प्रस्ताव धूळ खात पडला असल्याची वस्तुस्थिती पुढे आली आहे. पादचारी दिनाचे आयोजन करणारी देशातील पहिली महापालिका असा गाजावाजा करणाऱ्या महापालिकेची यानिमित्ताने पादचाऱ्यांबाबत असलेली असंवेदनशीलता स्पष्ट झाली आहे...**





स्मार्ट सिटी अभियानाअंतर्गत महापालिकेच्या विद्युत विभागाने शहरातील ५१ ठिकाणी पादचारी सिग्नल बसविण्याचा प्रस्ताव तयार केला आहे. या कामांसाठी ३९ लाख रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. पादचारी सिग्नल बसविण्यासाठी वित्तीय समितीमध्ये प्रस्तावाला मान्यता दिल्यानंतरच त्याची अंमलबजावणी केली जाणार आहे, असे आयुक्त, प्रशासक विक्रम कुमार यांनी सांगितले. मात्र अद्यापही वित्तीय समितीची मंजुरी न मिळाल्याने यंदा पादचारी सिग्नल सुरू होण्याची शक्यता कमी आहे.

जंगली महाराज रस्ता – स. गो. बर्वे चौक, छत्रपती संभाजी महाराज उद्यान प्रवेशद्वार, जंगली महाराज मंदिर, गोपाळकृष्ण गोखले रस्ता (फर्ग्युसन रस्ता)- बीएमसीसी चौक, वैशाली हॉटेल, शिवाजीनगर पोलिस ठाणे, सेनापती बापट रस्ता- सिम्बायोसिस महाविद्यालय प्रवेशद्वार, रत्ना हॉस्पिटल, राजभवन रस्ता – बालकल्याण संस्था, केंद्रीय विद्यालय, शिवाजी स्कूल औंध गावठाण, लाल बहादूर रस्ता – काका हलवाई समोर, बाजीराव रस्ता – महाराणा प्रताप उद्यान, लेले दवाखाना, फुटका बुरूज, शनिवार वाडा, नूमवी शाळेसमोर, गरवारे बालभवन, सारसबाग, पेशवे पथ – आंबिल ओढा कॉलनी, सोलापूर रस्ता – गाडीतळ हडपसर, पुणे-सोलापूर रस्ता मगर रुग्णालय, रवी दर्शन चौक, १५ नंबर सिग्नल, मगरपट्टा मुख्य प्रवेशद्वार, सीझन मॉल सिग्नल, ताडीगुत्ता चौक, पाषाण रस्ता-लॉयला स्कूल, सेंट जोसेफ हायस्कूल, कर्वे रस्ता- खंडोजी बाबा चौक, शेलार मामा चौक, पूना हॉस्पिटल चौक, गोखले मामा चौक, स्वातंत्र्य चौक, अभिनव चौक, पौड फाटा चौक, हुतात्मा राजगुरू चौक, कर्वे पुतळा चौक, कोकण एक्स्प्रेस चौक, वनदेवी माता मंदिर चौक, कर्वेनगर पूल चौक, खिलारे पाटील रस्ता, पाडळे पॅलेस चौक, एनडीए रस्ता – रमेशभाऊ वांजळे चौक, आंबेडकर चौक, गणपती माथा चौक, शिंदे पूल चौक,पौड रस्ता – पौड फाटा, केळेवाडी चौक, मोरे विद्यालय चौक या ठिकाणी पादाचरी सिग्नल बसविण्याचे प्रस्तावित आहे.

# भीक मागून यांना मंत्रिपदच मिळवता येते : अमोल मिटकरी

इंदापूर ।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**“सध्या मालकाला खूष करण्यासाठी स्पर्धा सुरू असून, याच माध्यमातून महाराष्ट्रातील महापुरुषांची बदनामी करण्याचे मोठे षडयंत्र सुरू आहे. यांना भीक मागून मंत्री पद मिळवता येते, मात्र शाळा उभ्या करता येत नाहीत. शाळा या कष्टाने उभ्या कराव्या लागतात,” अशी टीका विधान परिषदेचे आमदार अमोल मिटकरी यांनी केली.**



इंदापूर येथे राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने आयोजित ‘शरद कृषी महोत्सव २०२२’अंतर्गत युवा महोत्सवाच्या पहिल्या सत्रात मिटकरी बोलत होतो. यावेळी त्यांनी मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या वक्तव्याचा समाचार घेतला. माजी राज्यमंत्री व आमदार दत्तात्रेय भरणे, आमदार रोहित पवार, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष प्रदीप गारटकर, हनुमंत कोकाटे, छाया पडसळकर, सचिन सपकळ, प्रताप पाटील, रेहना मुलाणी, प्रवीण डोंगरे, तुकाराम करे, दिलीप वाघमारे, धनंजय बाब्रस, श्रीधर बाब्रस, बापूराव शेंडे, संदेश देवकर, अभिजित तांबिले, नवनाथ रूपनवर, सागर मिसाळ आदी यावेळी उपस्थित होते. अनिल रूपनवर व प्रतिक्षा बालगुडे यांनी सूत्रसंचालन केले.

मिटकरी म्हणाले,“सध्याचे सरकार अंधश्रद्धेला खतपाणी घालत आहे. राज्याचे मुख्यमंत्री ज्योतिषाला हात दाखवतात. राफेल विमान आणताना चाकाखाली लिंबे ठेवली जातात. चाळीस आमदार गुवाहाटीला जाऊन नवस बोलतात, त्यांनी बेळगावला जाऊन महाराष्ट्राच्या हितासाठी लढा द्यावा.”आमदार रोहित पवार म्हणाले, “राजकारणासाठी कोणीही आपला वापर करणार नाही, याची खबरदारी युवक-युवतींनी घेणे आवश्यक आहे. सर्व थोर व्यक्ती, महाराष्ट्र, देश यांच्या विरोधात जर कोण बोलत असेल; तर युवकांनी शांत बसता कामा नये. सोशल मीडियावर असे विचार आल्यास त्यास जोरदार विरोध करणे आवश्यक आहे.”

### ‘मंत्रिमंडळ विस्तारानंतर सरकार कोसळणार’

मंत्रिमंडळ विस्तार झाला की हे सरकार कोसळणार आहे. त्यामुळे मंत्रिमंडळ विस्तार होत नाही. अधिवेशनाच्या तोंडावर तात्पुरत्या स्वरूपात आपली खाती इतरांकडे सोपवली, याचा अर्थ स्पष्ट आहे की मंत्रिमंडळ विस्तार होणार नाही. सरकारमध्ये हिंमत असेल; तर जानेवारी महिन्यात तरी मंत्रिमंडळ विस्तार करून दाखवावा. मंत्रिमंडळ विस्तार झाला तर मारामारी होईल, हे देवेंद्र फडणवीस यांना माहीत आहे. त्यामुळे मंत्रिमंडळ विस्तार होणार नाही. खंडपीठाचा निर्णय ज्यावेळी होईल, त्यावेळी या सरकारमधील आमदारांची आमदारकी रद्द होणार आहे, असा दावा अमोल मिटकरी यांनी केला.

## बैलगाडा शर्यत लढा : सर्वोच्च न्यायालयात महिनाभरात अंतिम निकालाची शक्यता

# “रनिंग ॲबिलिटी ऑफ बुल्स रिपोर्ट” निर्णायक ठरेल!

### भाजपा, शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांचा विश्वास

पिंपरी । विशेष प्रतिनिधी । महाईन्यूज ।

**देशात बैलगाडा शर्यतींवरील बंदी कायमस्वरुपी उठवण्यासाठी सर्वोच्च न्यायालयात सुरू असलेल्या सुनावणीमध्ये महाराष्ट्र राज्य सरकाने सादर केलेला “रनिंग ॲबिलिटी ऑफ बुल्स रिपोर्ट” निर्णायक ठरणार आहे. सलग तीन दिवस सुरू असलेल्या युक्तीवादानंतर आता महिनाभरात शेतकरी आणि बैलगाडा प्रेमींच्या बाजुने निकाल लागेल, असा विश्वास भारतीय जनता पार्टीचे शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांनी व्यक्त केला.**



सर्वोच्च न्यायालयात बैलगाडा शर्यतीसंदर्भात अंतिम सुनावणी झाली. राज्य सरकारमधील संबंधित विभागाचे अधिकारी, अखिल भारतीय बैलगाडा संघटनेचे पदाधिकारी यांनी गेल्या २० दिवसांपासून दिल्लीत मुक्काम ठोकला होता. दि.२४ नोव्हेंबरपासून सुनावणी सुरू होती. सोमवारपासून पुन्हा सुरू झालेली सुनावणी गुरूवारी संपली.

भारताचे सॉलिसिटर जनरल सीनियर कौन्सिल तुषार मेहता, सीनियर कौन्सिल सिद्धार्थ भटनागर, सरकारी वकील सिद्धार्थ धर्माधिकारी, ॲड. आदित्य पांडे, ॲड. अभिकल्प प्रतापसिंह, ॲड. श्रीरंग वर्मा यांनी राज्य शासनाच्या वतीने युक्तिवाद केला. अखिल भारतीय बैलगाडा शर्यत संघटनेच्या खटल्यात राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ॲड. सिद्धार्थ दवे यांची स्वखर्चाने नियुक्ती केली होती. तसेच, संघटनेचे वकील ॲड. आनंद लांडगे यांनीही चांगले कामकाज केले, अशी माहिती संदीप बोदगे यांनी दिली.

आमदार लांडगे म्हणाले की, राज्यातील बैलगाडा शर्यत सुरू करण्याबाबत २०१७ मध्ये खऱ्या अर्थाने राज्य सरकारच्या पातळीवर प्रयत्न सुरू झाले. तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सकारात्मक भूमिका घेतली. तत्पूर्वीच्या कोणत्याही सरकारने बैलगाडा शर्यत सुरू व्हावी. यासाठी पुढाकार घेतला नाही. देशातील आघाडी सरकारने बैल या प्राण्याचा समावेश संरक्षित प्राण्यांच्या यादीत केला होता. फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली नियुक्त केलेल्या समितीच्या माध्यमातून “बैलाच्या पळण्याची क्षमता अहवाल” तयार करण्यात आला.

### ‘ॲनिमल वेलफेअर बोर्ड ऑफ इंडिया’चा विरोध मावळला...

महाराष्ट्रातील बैलगाडा शर्यत, तामिळनाडूतील जल्लिकट्टू, रेकला रेस, कर्नाटकमधील कंबाला शर्यत याविषयी या राज्यांनी केलेल्या कायद्याबाबत सर्वोच्च न्यायालयात अंतिम सुनावणी झाली. न्यायमूर्ती के. एम. जोसेफ, अजय रस्तोगी, अनिरुद्ध बोस, ऋषिकेश रॉय. सी. टी. रविकुमार या पाच न्यायाधीशांच्या खंडपीठासमोर ही सुनावणी झाली. ‘क्युपा’ या बैलगाडा शर्यतींना विरोध करणाऱ्या संघटनेकडून ॲड. सिद्धार्थ लुथ्रा यांनी युक्तिवाद केला. तसेच, ‘ॲनिमल वेलफेअर बोर्ड ऑफ इंडिया’ने आपले प्रतिज्ञापत्र सर्वोच्च न्यायालयात सादर केले. या बोर्डाचा यापूर्वी शर्यतींना विरोध असला तरी आता राज्य शासनाने सक्षम कायदे व नियम अटी केल्याने त्या कायद्याची अंमलबजावणी करावी, असे सांगून शर्यतींना आता आपला विरोध नसल्याचे बोर्डाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे शयतींवरील बंदी कायमस्वरुपी उठण्याचा मार्ग मोकळा झाला आहे, असेही संदीप बोदगे यांनी सांगितले.

### ‘हे’ संशोधन करणारे महाराष्ट्र पहिले राज्य...

सर्वोच्च न्यायालयात सुरू असलेल्या सुनावणीमध्ये बैलांची पळण्याची क्षमता अहवाल अर्थात रनिंग ॲबिलिटी ऑफ बुल्स् रिपोर्ट निर्णायक ठरणार आहे. त्यासाठी तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्य सरकारच्या माध्यमातून विशेष समिती स्थापन केली होती. त्या समितीच्या अहवालाच्या आधारे बैल पळू शकतो, असे संशोधनातून सिद्ध करण्यात आले. आमदार महेश लांडगे यांनी पाठपुरावा करुन २०१७ मध्ये समिती स्थापन करण्यासाठी पुढाकार घेतला. त्यामुळेच आज देशभरातील बैलगाडा शर्यती पुन्हा कायमस्वरुपी सुरू होण्याचा मार्ग मोकळा होणार आहे, असेही संदीप बोदगे यांनी म्हटले आहे.


# मोशीमधील बोऱ्हाडेवाडीतील नैसर्गिक नाल्याची दुरवस्था!

## स्थानिक नागरिक हैराण : महापालिका प्रशासनाचे दुर्लक्ष



मोशी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**बोऱ्हाडेवाडी येथील नैसर्गिक नाल्याचे चेंबर तुटले आहे. त्यामुळे दुर्गंधीयुक्त सांडपाणी रस्त्यावर येत असून, सर्वसामान्य नागरिकांना नाहक मन:स्ताप सहन करावा लागत आहे. मात्र, पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाकडून याकडे डोळेझाक केली जात आहे. परिणामी, रहिवाशांकडून संताप व्यक्त होत आहे.**



बोऱ्हाडेवाडी येथील नैसर्गिक नाल्यातील चेंबर गेल्या अनेक दिवसांपासून तुटलेला आहे. परिणामी, सांडपाणी बाहेर पडून दुर्गंधी पसरलेली आहे. तसेच, मैलामिश्रीत पाणी शेतातून वाहू लागल्यामुळे शेतमालाचेही नुकसान होत आहे. याबाबत स्थानिक नागरिकांनी वारंवार तक्रारी करुनही प्रशासनाकडून दखल घेतली जात नाही. या भागातील वाघेश्वर कॉलनी, स्वराज्य कॉलनी, कुमार प्रिन्सविल्ले सोसायटी परिसरातील नागरिकांना दुर्गंधीचा त्रास सहन करावा लागतो. याबाबत तात्काळ कार्यवाही करावी, अशी मागणी सर्वसामान्य नागरिकांनी केली आहे.

### कर घेता तर सुविधा द्या : ज्ञानेश्वर बोऱ्हाडे

पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासन स्थानिक नागरिकांकडून कर वुसली करते. त्याबदल्यात सामान्य नागरिकांना चांगल्या पायाभूत सोयी-सुविधा देणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. चेंबर देखभाल-दुरुस्तीसाठी वर्षाकाठी कोट्यवधी रुपये प्रशासनाकडून खर्च केला जातो. मात्र, गेल्या अनेक दिवसांपासून आमच्या बोऱ्हाडेवाडीतील नैसर्गिक नाल्यातील चेंबरच्या दुरुस्तीकडे प्रशासनाकडून डोळेझाक केली जात आहे. त्यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये नाराजी असून, प्रशासनाने तात्काळ कार्यवाही करावी, अशी प्रतिक्रिया सामाजिक कार्यकर्ते ज्ञानेश्वर बोऱ्हाडे यांनी व्यक्त केली आहे.

## संपादकीय »

### भाष्य : शिक्षण व्यवस्थेतील 'अछूत कन्या'

***मानवी हक्कांबाबत व्यासपीठावर चर्चा होते, आदेश निघतात, कार्यक्रमही होतात. तथापि, मानवी हक्कांचा आदर करून त्यांचे पालन करण्याबाबत उदासीनता आढळते. शिक्षणक्रमात त्याबाबतच्या अभ्यासक्रमाचा समावेश करण्यासाठी पावलेही उचलली गेली. मात्र शिक्षणासह अनेक क्षेत्रामध्ये हक्कांची पायमल्ली होताना दिसते.***

मानवी अधिकारांचा जागतिक जाहीरनामा दिवस १० डिसेंबर रोजी साजरा केला जातो. पण मानवी अधिकारांच्या उल्लंघनाच्या आणि अवमुल्यनाच्या घटनांचा आलेख मात्र कमी होत नाही, ही वस्तुस्थिती आहे. अगदी संयुक्त राष्ट्रांच्या मानवी अधिकार आयोगाने देखील अशा घटनांच्या नोंदी घेण्यापलीकडे ठोस असे कार्य केलेले नाही. कारण जागतिक राजकारणात मानवी हक्कांचे उल्लंघन होत असेल तर त्याबाबत हाळी देण्याचा मक्ता हा अमेरिका आणि अमेरिका-अंकित युरोपातील काही देशांनाच असल्याने इतर देश आणि काही संघटना यांच्या भूमिका आपसूकच अर्थहीन होताना दिसत आहेत. मानवी हक्कांच्या उल्लंघनाचा संदर्भ हा केवळ युद्ध, देशांतर्गत बंडाळी, दहशतवादी हल्ले, वांशिक, धार्मिक आणि जातीय दंगली एवढ्यापुरताच राहिला आहे. थोड्या फार प्रमाणात स्वायत्तता आणि स्वयं-निर्णयासाठी लढणाऱ्या अल्पसंख्यांक समुदायाबाबत गरज पडेल तसा त्याचा उल्लेख केला जातो, असे चित्र आहे. एक व्यक्ती म्हणून दैनंदिन जीवनात समाजातील अनेक संस्थांशी आपला संबंध येत असतो, विशेषत: प्रशासकीय किंवा शिक्षण-व्यवस्था, या ठिकाणी आपले काम करून घेण्यासाठी जो काही अनुभव येतो, तो मानवी हक्कांच्या उल्लंघनाच्या चौकटीत बसतो की नाही हे आजमितीस पाहणे गरजेचे आहे. शासन व्यवस्थेतील कारभार कितीही पारदर्शी आणि एकल खिडकीच्या कक्षातून केला जात असला तरी प्रत्यक्षात तो कसा आहे? हे सात-बाराचा उतारा घेण्यासाठी आणि वडिलोपार्जित मिळकतीवर नावे लावून घेण्यासाठी येणाऱ्या अनुभवातून उमजून येतो. याला व्यक्तिशः कोणी जबाबदार नसले तरी, प्रशासकीय-संरचनेमुळे मानवी हक्कांच्या बाजूने लढणारे भले-भले लढवय्ये, प्रशासकीय व्यवस्थेपुढे नांगी टाकताना दिसतात. अशीच अवस्था, किंबहुना यापेक्षा बेदरकार आणि भीषण वस्तुस्थिती शिक्षण-व्यवस्थेत अनुभवाला येते. शिक्षण क्षेत्राचा सहवास म्हणजे कधी काळी भारतीय संस्कृतीचे दर्शन असे मानले जाते. म्हणून आजही नालंदा, तक्षशीला यांचा उल्लेख भारतीय संस्कृती आणि संस्कारांची मंदिरे म्हणून केला जातो.

# पाणी कशासाठी वापरावे?






कोकणातील पाणी मराठवाड्याला देणे, हे तत्त्वत: योग्य असले तरी या मोठा खर्च आणि व्याप करून दिल्या जाणाऱ्या पाण्याचा वापर नेमका कशासाठी होणार आहे? तो जर उसासाठी होणार असेल तर त्यात आम शेतकऱ्याचे काहीच भले नाही. त्यामुळे सरकारने कोकण असो की मराठवाडा; गृहिणींच्या डोक्यावरील पाण्याचे हंडे उतरविण्याची भूमिका प्राधान्याने घ्यायला हवी...

कोकणातील समुद्रात वाहून जाणारे पाणी मराठवाड्यात वळविण्याचा मनोदय उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुन्हा एकदा बीड येथे व्यक्त केला. परंतु ही योजना आर्थिक व तांत्रिकदृष्ट्या परवडणारी नाही. समुद्रसपाटीपासून कोकणची उंची सर्वसाधारण ८० मीटर आहे. कोकणातील पश्चिमवाहिनी नद्यांचे पाणी मराठवाड्यातील पूर्ववाहिनी नद्यांमध्ये वळविण्यात प्रचंड ऊर्जा खर्च होईल. रत्नागिरीची उंची ५८ मीटर तर मराठवाड्याची उंची ५६८ मीटर आहे. म्हणूनच खताळ आयोगाने अहवालात या योजनेला विरोध केला होता. शिवाय, कोकणचं पाणी वळवलं तरी मराठवाडा अखेर तहानलेलाच राहील. तेथील जनतेला स्वप्नात गुंतवून काहीच निष्पन्न होणार नाही. जलतज्ज्ञ डॉ. माधवराव चितळे यांनी म्हटले होते की, पशुपालन क्षेत्रात मराठवाड्यात डेन्मार्क बनण्याची क्षमता आहे. दुधाच्या व पशुपालनाच्या व्यवसायात आर्थिक प्रगती अपेक्षित असताना आपण ऊसाच्या मृगजळाच्या मागे लागलो आहोत. उसाच्या अतिलागवडीमुळे मराठवाडा वाळवंटी भूप्रदेश होईल, असा इशारा जलतज्ज्ञ डॉ. राजेंद्रसिंह यांनी यापूर्वीच दिला आहे. आश्चर्य म्हणजे, महाराष्ट्रातील १७३ साखर कारखान्यांपैकी ८० कारखाने या दुष्काळी पट्ट्यातच आहेत. एक टन ऊस गाळपाकरिता पाचशे लिटर पाणी वापरण्यासाठी कोकणाला कशाला वेठीस धरता? महाराष्ट्रात ऊस लागवडीचे क्षेत्र जेमतेम साडेपाच लाख हेक्टर असून एकूण लागवड जमिनीपैकी ऊस क्षेत्र जेमतेम तीन टक्केच आहे. मात्र, त्यासाठी सिंचनाचे तब्बल ६० टक्के पाणी वापरले जाते. राज्यातील सिंचनाचे बहुतेक पाणी अशा प्रकारे ऊसच पितो. याउलट काही कोटी लिटर कोयनेचे पाणी वशिष्ठीतून वाहून जाऊन अरबी समुद्राला मिळते आहे. तसेच, १५० इंच पाऊस पडणाऱ्या कोकणात महापुरामुळे प्रचंड जीवितहानी आणि नुकसान होते; तर उन्हाळ्यात खेड्यातील बायाबापड्यांना पिण्याच्या पाण्यासाठी डोक्यावर हंडा घेऊन मैलोनमैल पायपीट करावी लागते. हे अगदी विपरीत चित्र आहे. वशिष्ठी, सावित्री, शास्त्री आदी कोकणातील नद्यांचा उगम सह्याद्रीच्या खोऱ्यातच होतो. रत्नागिरी जिल्ह्यातील नद्यांमधील पाण्याची एकूण क्षमता ६१२ टीएमसी, म्हणजे ९८ टीएमसी क्षमतेच्या कोयना धरणापेक्षा सहापट आहे, असे म्हणता येईल. परंतु, हे सारे पाणी सरळ समुद्रात वाहून जाते. छोट्या धरणांची साखळी निर्माण करून ते वीजनिर्मितीसाठी आणि सिंचनासाठी वापरण्याची सूचना डॉ. एम. एस. स्वामीनाथन यांच्या समितीने केली होती. परंतु ती बासनात बांधून ठेवण्यात आली आहे. जागतिक जल परिषदेमध्ये असा इशारा दिला गेला की पुढची युद्धे पाण्यासाठी होतील. निसर्गाचा असमतोल, पर्यावरणामध्ये बिघाड, प्रचंड वृक्षतोड या सर्व घटकांचा परिणाम पर्जन्यमानाच्या विस्कळीतपणावर होतो आहे. मात्र, याची पुरेशी दखल घेतली गेलेली नाही. गतवर्षी राज्यातील सुमारे ४० हजार गावांपैकी जवळपास २५ हजार गावात गंभीर पाणीटंचाई होती. त्यातच, गेली अनेक वर्षे बेछूटपणे भूजलाचा प्रचंड उपसा होत आहे. २२ लाखांहून अधिक शेतीपंप प्रचंड प्रमाणात सातत्याने पाण्याचा उपसा करीत आहेत. महाराष्ट्रातील केवळ ३.४ टक्के शेतकरी ऊस, केळी, द्राक्ष आणि संत्री पिकवितात. मात्र, हेच शेतकरी पाण्याचा उपसा प्रचंड प्रमाणात करतात. तसेच, शहरे आणि महानगरांमधील तथाकथित उच्चभ्रू रहिवासीही पाण्याची प्रचंड नासाडी करतात. एका अर्थाने पाण्याचा चंगळवाद विशेषकरून गरिबांच्या जिवावर परवडणारा नाही. मात्र, आपण हे लक्षातच घेत नाही. ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ प्रा. जवाहर देसरडा यांच्या मते पाटबंधारे, पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणारे प्रकल्प उभे राहिले. त्यावर आजवर किमान एक लाख कोटी रुपये खर्च झाले.

## मानवी हक्कांची पायमल्ली रोखण्यासाठी विशेष कायदा हवा...

**देशातील दलित, अदिवासी वंचित समुदायांना अनेकदा खासगी क्षेत्रातही भेदभावाचा, हीन वागणुकीचा सामना करावा लागतो.**

संसदेचे हिवाळी अधिवेशन ७ डिसेंबरपासून सुरू झाले आहे. या अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी राज्यसभेच्या विशेष सत्रामध्ये राष्ट्रीय जनता दलाचे राष्ट्रीय प्रवक्ते व राज्यसभा खासदार प्राध्यापक मनोज कुमार झा यांनी जाती-वंशभेद आधारित भेदभाव तसेच मॉब लिंचिंगसारख्या घटनांना आळा घालण्यासाठी कठोर कायद्याच्या आवश्यकतेबाबत आपले मत मांडले.




भारताने आंतरराष्ट्रीय स्तरावर मानवी हक्कांच्या संरक्षणासंदर्भात कटिबद्ध राहण्यासाठी अनेक करारांवर स्वाक्षऱ्या केल्या आहेत. परंतु विद्यमान भाजप सरकारकडून तत्संबंधीची जबाबदारी नेटकेपणाने पार पाडली जात नसल्याची खंत प्रा. झा यांनी व्यक्त केली. देशात दलित तसेच आदिवासी समुदायाचे होणारे शोषण तसेच भेदभाव रोखण्यासाठी अनुसूचित जातिजमाती (अत्याचार निवारण) कायदा १९८९ ची तरतूद आहे. परंतु याव्यतिरिक्त वंशाधारित भेदभावविरोधी कराराच्या वचनबद्धतेचे काटेकोर पालन करण्यासाठी विशेष कायदे गरजेचे आहेत, हे प्रा. झा यांचे वक्तव्य मानव हक्क अधिकार दिनाचे महत्त्व अधोरेखित करणारे आहे. त्यांच्या या भाषणात खासगी क्षेत्रात वंचित समुदायाचे हक्क किती अबाधित राहतील या प्रश्नावर भर होता.

देशातील दलित, अदिवासी वंचित समुदायांना अनेकदा खासगी क्षेत्रातही भेदभावाचा, हीन वागणुकीचा सामना करावा लागतो. आज देशात प्राथमिक व उच्च शिक्षण, आरोग्य सुविधा, वाहतूक व दळणवळणासह इतर महत्त्वाच्या गोष्टींचे झपाट्याने खासगीकरण होत आहे. येणाऱ्या काळात या खासगी क्षेत्रात दलित, आदिवासी, अल्पसंख्याक समुदायाचे किती प्रतिनिधित्व असेल ही चिंतेचीच बाब आहे. आजतरी खासगी क्षेत्रातील आरक्षणाबाबत सर्वच राजकीय पक्षांनी मौन बाळगले आहे. प्रोफेसर झा यांनी आणखी एक मुद्दा या भाषणात विशेषत्वाने मांडला. अनेकदा दलित अदिवासी समुदायातील व्यक्तींना भाडेतत्त्वावर घरदेखील नाकारले जाते. दलित समुदायातील उच्चशिक्षित वर्गालाही शहरात घर मिळवताना संघर्ष करावा लागतो. अनेकदा घरमालक जात विचारतात. ती कळल्यावर घर द्यायला चालढकल, टाळाटाळ करतात. शेवटी काहीतरी कारण सांगून नकार दिला जातो. तसेच ग्रामीण व शहरी भागातील एखादी मोक्याच्या ठिकाणची जागा विकत घेताना उच्चवर्णीयांकडून अडथळे आणले जातात. मांसाहार करणाऱ्यांना घर नाकारले जाते.

ईशान्य भारतातील राज्यांमधील विद्यार्थांना देशात अनेक राज्यांमध्ये सार्वजनिक ठिकाणी त्रास दिला जातो. हे रोखण्यासाठी विशेष कायदे करून त्यांची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे मानवी हक्कांच्या संरक्षणासाठी आवश्यक ठरते.

## ।। अभंगवाणी ।।



अइकाल परी ऐसें नव्हे बाई ।
न संडा या सोई भ्रताराची ॥१॥
नव्हे आराणुक लौकिकापासून ।
आपुल्या आपण गोविलें तें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयमधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# आपणही होता अडीच वर्षे, काय केलं सीमाप्रश्नाचं?

## सीमावाद : देवेंद्र फडणवीसांचा उद्धव ठाकरेंना सवाल!

| मुंबई | महाईन्यूज |

समृद्धी महामार्गाच्या उद्या (रविवार) रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या हस्ते नागपूर ते शिर्डी या टप्प्याचं उद्घाटन होणार असून, या पार्श्वभूमीवर प्रशासनाकडून उद्घाटन कार्यक्रमाची जय्यत तयारी सुरू करण्यात आली आहे. मात्र, उद्घाटनाच्या एक दिवस आधी शिवसेना (ठाकरे गट) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी, सीमाप्रश्न सोडवता येत नसेल तर महामार्गाला बाळासाहेब



ठाकरे यांचं नाव देण्याचा काही अधिकार नाही, असं म्हणत टीका केली आहे. यावर आता उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी त्यांना प्रत्युत्तर दिलं आहे. नागपुरात प्रसारमाध्यमांशी बोलताना फडणवीस म्हणाले, “मला असं वाटतंय की सीमाप्रश्न कालच तयार झाला आहे आणि आमचं सरकार हे जे सहा महिन्यांपूर्वी आलं, त्यामुळेच सीमीप्रश्न तयार झाला आहे. अशाप्रकारचं वक्तव्यं हे केलं जात आहे. माझा प्रश्न असा आहे की, आपणही होता अडीच वर्षे काय केलं सीमाप्रश्नाचं?, कुठली केस आपण लावून घेतली? त्या संदर्भात एकतरी प्रगती केली का?” याशिवाय, “हा विषय वर्षानुवर्षे चालला आहे, गंभीर आहे. त्यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयात खटला सुरू आहे. यापूर्वी महाराष्ट्रात अशाप्रकारच्या प्रश्नावर कधी राजकारण झालं नाही. आम्ही अनेक वर्ष विरोधी पक्षात होतो, तिकडे कर्नाटकामध्ये आमच्या मराठी बांधवांवर अन्याय झाला, लाठीचार्ज झाला. सगळे एकत्रितपणे विधानभवनात पक्षाचा विचार न करता एकत्रित येत होतो. एकमेकांवर बोटं दाखवत नव्हतो. मला असं वाटतं सीमा प्रश्नाच्या गंभीरतेपेक्षा, त्यावर किती जास्त राजकारण करता येईल हा प्रयत्न सुरू आहे.” असंही फडणवीसांनी यावेळी म्हटलं. उद्धव ठाकरे काय म्हणाले आहेत?

“समृद्धी महामार्ग झालाच पाहिजे. पण एका मोठ्या रस्त्याचं उद्घाटन करत असताना महाराष्ट्र आणि कर्नाटकचा रस्ता कर्नाटक जर महाराष्ट्रासाठी बंद करत असेल, तर पंतप्रधान म्हणून तुम्ही त्यांना काय बोलणार आहात? आणि महाराष्ट्राला काय दिलासा देणार आहात? हे आधी बोला आणि मग शिवसेनाप्रमुखांचं नाव असलेल्या महामार्गाचं उद्घाटन करा. कारण स्वत: शिवसेनाप्रमुख सीमाप्रश्नासाठी तीन महिने तुरुंगात राहिले होते.

## आता निवडणुका घेण्याची हिंमत दाखवा; आदित्य ठाकरे यांचे सत्ताधाऱ्यांना आव्हान

| अलिबाग | महाईन्यूज |

गुजरात, हिमाचल या राज्यांबरोबरच दिल्ली महापालिकेचे निकाल लागलेत. या मोठ्या विजयानंतर आता त्यांना राज्यात निवडणूक घ्यायला भीतीचं काहीच कारण नाही. आतातरी राज्यात लोकशाही पद्धतीने निवडणुका घ्या, असं आव्हान युवा सेनाप्रमुख आदित्य ठाकरे यांनी राज्यातील सत्ताधाऱ्यांना दिलं आहे. राज्यात महापालिकांबरोबरच राज्य विधानसभेची निवडणूक घ्यायला हवी, कारण राज्यात सध्या घटनाबाह्य सरकार असल्याचे त्यांनी नमूद केले.

रोहा इथं सुरू झालेल्या राज्य अजिंक्य पद व निवड चाचणी



खो-खो स्पर्धेचे उद्घाटन केल्यानंतर ते पत्रकारांशी बोलत होते. आज महाराष्ट्राचे खच्चीकरण सुरू आहे. एकीकडे राज्यातील उद्योग पळवले जाताहेत. राज्यातील गावे, जिल्हे पळवले जाताहेत. महत्त्वाचे म्हणजे महापुरुषांचा अवमान केला जातोय. त्याविरोधात मोठा मोर्चा काढतोय. केवळ हा महाविकास आघाडीचा मोर्चा नाही. राज्यातील सर्व महाराष्ट्रप्रेमींचा हा मोर्चा आहे.

## “न्यायव्यवस्थेला बुडाखाली घेण्याचा सरकारचा प्रयत्न”

### उद्धव ठाकरेंचा मोदी सरकारवर घणाघात!

| सांगली | प्रतिनिधी | महाईन्यूज |

शिवसेना(ठाकरे गट) पक्षप्रमुख आणि माजी मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांचे हस्ते जालना जिल्ह्यातील घनसावंगी येथे ४२ व्या मराठवाडा साहित्य संमेलनाचे उद्घाटन आज(शनिवार) झाले. यावेळी उद्धव ठाकरे यांनी आपल्या भाषणाद्वारे केंद्रातील मोदी सरकारवर जोरदार टीका केली. न्यायव्यवस्थेला बुडाखाली घेण्याचा सरकारचा प्रयत्न आहे, असा त्यांनी आरोप केला.

उद्धव ठाकरे म्हणाले, “निवडून



देण्याचा जसा अधिकार आहे, तसं परत बोलावण्याचा अधिकारही मतदाराला असला पाहिजे. मग मूलभत प्रश्न असा आहे, खरंच आपल्या देशात लोकशाही रूजली आहे का? हे ४२ वं साहित्य संमेलन आहे, म्हणजे आपल्या स्वातंत्र्यानंतर किंवा स्वातंत्र्याच्या आधीपासून साहित्यसंमेलन होत आहेत. त्यावेळी स्वातंत्र्यवीर सावरकर बोलले होते, साहित्यिकांनो लेखण्या मोडा आणि बंदुका हाती घ्या. मग मला तुम्ही बोलावलं आहे मी त्यांच्या पुढे एक पाऊल काय सांगू अणुबॉम्ब हाती घ्या? नाही गरज नाही. तेव्हा स्वातंत्र्य मिळवायचं होतं, आज स्वातंत्र्य टिकवायचं आहे. हे विसरू नका बंदुका घेण्याची अजिबात गरज नाही. पण तुमच्या शब्दांमध्ये बंदुकीची ताकद आहे. शब्दाचं सामर्थ फार मोठं आहे. लोकशाही आपल्या देशात रूजली आहे का?

# कर्नाटकचे मुख्यमंत्री बोम्मई यांचं थेट अमित शाह यांना आव्हान?

## कर्नाटकचे मुख्यमंत्री बोम्मई यांनी पुन्हा महाराष्ट्राला डिवचलं

| मुंबई | महाईन्यूज |

कर्नाटक सरकारच्या आक्रमक भूमिकेनंतर, सीमाभागांत मराठी भाषकांविरोधातील हिंसक घटना आणि तप्त राजकीय वातावरण शांत करण्यासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी मध्यस्थी करण्याची तयारी दाखविली आहे. त्यासाठी १४ डिसेंबर रोजी दोन्ही राज्यांच्या मुख्यमंत्र्यांना दिल्लीत बोलावले असून त्यांच्याशी गृहमंत्री चर्चा करणार आहेत. मात्र अमित शाह यांनी दखल घेतल्यानंतरही कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांनी पुन्हा एकदा महाराष्ट्राला डिवचलं आहे. विशेष म्हणजे अमित शाह यांची भेट घेऊन काही होणार नाही असं सांगत त्यांनी थेट केंद्रीय नेतृत्वालाच आव्हान दिलं आहे.

दरम्यान सोमवारी कर्नाटकच्या खासदारांसह आपण अमित शाह यांची भेट घेणार असल्याची माहिती त्यांनी दिली आहे. अमित शाह यांच्यासमोर आपण राज्याची कायदेशीर भूमिका मांडणार असल्याचं ते म्हणाले आहेत.

“कर्नाटकातील विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री अशा पद्धतीने बोलत असल्याचं स्पष्ट होत आहे. त्यांना कदाचित केंद्र सरकारचे



### बोम्मई यांनी पुन्हा महाराष्ट्राला डिवचलं

**बोम्मई यांनी पुन्हा एकदा ट्वीट केलं असून महाराष्ट्राला डिवचण्याचं काम केलं आहे. “महाराष्ट्रातील शिष्टमंडळाने केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतल्याने काही फरक पडणार नाही. महाराष्ट्राने याआधीही असे प्रयत्न केले आहेत. हे प्रकरण सुप्रीम कोर्टात आहे. सुप्रीम कोर्टात आमची बाजू भक्कम आहे. सीमावादावर आमचं सरकार कोणतीही तडजोड करणार नाही,” असं बोम्मई म्हणाले आहेत.**

आशीर्वाद असतील. पण आम्ही काल जेव्हा अमित शाह यांना भेटलो तेव्हा त्यांनी गांभीर्याने दखल घेतली आणि १४ तारखेला दोन्ही मुख्यमंत्र्यांशी बोलतो असं सांगितलं. पण हे लोक केंद्र आणि वरिष्ठ नेत्यांनाही जुमानत नाहीत असा अर्थ होतो,” अशी प्रतिक्रिया अरविंद सावंत यांनी एबीपी माझाशी बोलताना दिली.

“न्यायिक व्यवस्थेला तुम्ही मानता की नाही? सुप्रीम कोर्टात खटला प्रलंबित असतानाही अशी वक्तव्यं केली जात आहेत. त्यांनी याआधीही अशा गोष्टी करुन दाखवल्या आहेत. देशाच्या संविधानाला, न्यायव्यस्थेला जुमानायचं नाही असं त्यांनी ठरवलं आहे. केंद्राने याची गंभीर दखल घेतली पाहिजे,” अशी मागणी त्यांनी केली आहे. “भाजपाचे इतके खासदार असताना, राज्य सरकार असतानाहीही कोणतीच भूमिका घेतली जात नाही,” अशी टीकाही त्यांनी केली. “नेहरुंच्या चुकीमुळे तो भाग

# हिमाचल प्रदेशच्या मुख्यमंत्रीपदी सुखविंदर सिंग सुखू; उपमुख्यमंत्रीपदी मुकेश अग्निहोत्री यांची निवड!

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज ।प्रतिनिधी।



हिमाचल प्रदेशमधील काँग्रेस प्रचार समितीचे प्रमुख सुखविंदर सिंग सुखू हे हिमाचलचे नवे मुख्यमंत्री होतील, असे पक्षातर्फे शनिवारी घोषित करण्यात आले. पक्षश्रेष्ठींनी हमीरपूर जिल्ह्यातील नादौन येथून निवडले गेलेले ५८ वर्षीय आमदार सुखू यांचे नाव मुख्यमंत्रिपदासाठी निश्चित केले आहे. उपमुख्यमंत्रीपदासाठी मुकेश अग्निहोत्री यांची निवड झाली असून ते विधानसभेत विरोधी पक्षनेते होते. दरम्यान, मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्रिपदाचा शपथविधी उद्या, रविवारी होणार असल्याचे पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी शनिवारी जाहीर केले.

हिमाचल प्रदेश काँग्रेस समितीचे माजी अध्यक्ष सुखू हे चार वेळा आमदारपदी निवडून गेले आहेत. ते पक्षनेते राहुल गांधी यांच्या निकटवर्तीय मानले जातात. काँग्रेसचे दिग्गज नेते आणि सहा वेळा मुख्यमंत्रिपद भूषवलेले दिवंगत वीरभद्र सिंह यांचे विरोधक अशी त्यांची ओळख आहे. शनिवारी संध्याकाळी उशिरा सिमला येथे पक्षाच्या नवनिर्वाचित आमदारांच्या बैठकीत सुखू यांची काँग्रेस विधिमंडळ पक्षनेतेपदी निवड होण्याची शक्यता आहे. विधिमंडळ पक्षाची २४ तासांतील ही दुसरी बैठक असेल. शुक्रवारी संध्याकाळी झालेल्या बैठकीत आमदारांनी पक्षाध्यक्षांना विधिमंडळ पक्षनेता (मुख्यमंत्री) निवडण्याचे अधिकार देण्याचा ठराव एकमताने मंजूर केला होता. काँग्रेसने ६८ पैकी ४० विधानसभा जागांवर विजय मिळवत बहुमत मिळवल्याने हिमाचल प्रदेशमधील भाजपची सत्ता संपुष्टात आली. काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्ष व वीरभद्र सिंह यांच्या पत्नी प्रतिभा सिंह व विधानसभेतील विरोधी पक्षनेते मुकेश अग्निहोत्री यांच्यासह अनेक नेते मुख्यमंत्रिपदाच्या शर्यतीत होते. त्यासाठी या इच्छुकांनी मोर्चेबांधणी चालवली होती. विधिमंडळ पक्षाची म्हणजे नवनिर्वाचित काँग्रेस आमदारांची बैठक शनिवारी संध्याकाळी विधानसभा भवनातच होणार असल्याची माहिती कुल्लूचे आमदार सुंदर सिंग ठाकर यांनी दिली. याआधी पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी पक्षाचे निरीक्षक हिमाचलला पाठवले असल्याचे सांगितले होते.

## हिमाचलप्रमाणे कर्नाटकमध्येही एकजुटीने काम करा : खरगे

**कलबुर्गी (कर्नाटक) : हिमाचल प्रदेशच्या मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्रिपदाचा शपथविधी उद्या, रविवारी (१२ डिसेंबर) होणार असल्याचे काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी शनिवारी कर्नाटकात पत्रकारांना सांगितले. काँग्रेसच्या पक्षाध्यक्षपदी निवड झाल्यानंतर प्रथमच आपल्या कलबुर्गी या गावाला खरगे यांनी भेट दिली. या वेळी त्यांनी कर्नाटकमध्ये पुढील वर्षी एप्रिल-मेमध्ये होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत एकजुटीने काम करण्याचे आवाहन काँग्रेस नेते-कार्यकर्त्यांना केले. ते म्हणाले, की हिमाचल प्रदेशमध्ये दहा कलमी कार्यक्रम देऊन काँग्रेसने विजय मिळवला. तेथे आपण चांगल्या बहुमताने विजयी झालो आहोत. उद्या तेथे आपल्या सरकारचा शपथविधी सोहळा आहे. त्यामुळेच मी पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांशी चर्चा करण्यासाठी गेलो होतो. येथे पक्षाच्या मोठ्या मेळाव्यात बोलताना खरगे म्हणाले, की सर्व सबंधितांशी चर्चा केल्यानंतर आम्ही मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्रिपदाचा शपथविधी उद्या, रविवारी करण्याचा निर्णय घेतला आहे. हिमाचलप्रमाणे कर्नाटकमध्येही विजय मिळवण्यासाठी सर्वांनी हातमिळवणी करून एकजुटीने काम करण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे. मला कर्नाटकमध्ये काँग्रेस पक्षाचे सरकार हवे आहे.**

# गुजरातच्या मुख्यमंत्रीपदी पुन्हा भूपेंद्र पटेल

## उद्या शपथविधी; राज्यपालांची भेट

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।



**नुकत्याच पार पडलेल्या गुजरात विधानसभा निवडणुकीत दणदणीत विजय मिळवून सत्ता कायम राखणाऱ्या भाजपच्या विधिमंडळ पक्षाने शनिवारी विद्यमान मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांची नेता म्हणून निवड केली. त्यामुळे पटेल सलग दुसऱ्यांदा राज्याची धुरा सांभाळणार आहेत. विधिमंडळ पक्षाच्या बैठकीनंतर पटेल यांनी राजभवनात राज्यपाल आचार्य देवव्रत यांची भेट घेतली व सरकार स्थापनेचा दावा केला.**

विधानसभा निवडणुकीचे निकाल जाहीर झाल्यानंतर दोन दिवसांनी पटेल यांनी सरकार स्थापनेचा दावा केला. १८२ सदस्यांच्या गुजरात विधानसभेत १५६ जागांवर भाजपचा विजय झाला आहे. १२ डिसेंबर रोजी गांधीनगर येथील नवीन सचिवालयाजवळील हेलिपॅड मैदानावर पटेल राज्याचे १८ वे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतील. या सोहळ्यास पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा व भाजपशासित राज्यांचे मुख्यमंत्री उपस्थित राहणार असल्याचे भाजपकडून कळवण्यात आले आहे. अहमदाबादमधील घाटलोडिया विधानसभा मतदारसंघातून पटेल सलग दुसऱ्यांदा विजयी झाले आहेत. गेल्या वर्षी सप्टेंबरमध्ये विजय रुपानी यांच्या राजीनाम्यानंतर पटेल यांच्याकडे मुख्यमंत्रिपदाची सूत्रे आली होती. गुजरातमधील भाजप मुख्यालय 'कमलम' येथे विधिमंडळ पक्षाच्या बैठकीनंतर पत्रकारांशी बोलताना पटेल म्हणाले, की भाजपच्या निवडणूक जाहीरनाम्यात दिलेल्या वचनानुसार समान नागरी संहिता लागू करणे हे त्यांच्या सरकारचे प्राधान्य असेल. पक्षाने प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात नमूद केले, की नवनिर्वाचित आमदारांची आज 'कमलम' येथे बैठक झाली. त्यात गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून भूपेंद्र पटेल यांच्या नावाचा प्रस्ताव मांडण्यात आला. हा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला. पटेल यांच्या नावाचा प्रस्ताव आमदार कनू देसाई यांनी मांडला आणि त्याला आमदार शंकर चौधरी, पूर्णेश मोदी, मनीषा वकील, रमण पाटकर आणि पक्षाचे मुख्य प्रतोद पंकज देसाई यांनी पाठिंबा दिला. भाजपचे ज्येष्ठ नेते व केंद्रीय संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, ज्येष्ठ नेते व कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री बी. एस. येडियुरप्पा आणि झारखंडचे माजी मुख्यमंत्री अर्जुन मुंडा हे केंद्रीय निरीक्षक म्हणून आमदारांच्या बैठकीत उपस्थित होते. निवडीनंतर भूपेंद्र पटेल यांनी सांगितले, की पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांच्या मार्गदर्शनाखाली राज्य सरकार व भाजप गुजरातमध्ये प्रभावीपणे काम करेल. भाजपची गुजरातवासीयांप्रती बांधिलकी कायम आहे. त्याबद्दल त्यांच्या मनात समाधान आहे. त्याद्वारे आपले प्रश्न सोडवले जातील, याबद्दल गुजरातच्या जनतेला खात्री आहे. गुजरातमध्ये सलग सातव्यांदा भाजपचे सरकार स्थापन होणार आहे.

# दक्षिण भारतावर मंदोस वादळाचे संकट; महाराष्ट्र, गुजरातमध्ये पाऊस

।नवी दिल्ली।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

तामिळनाडू, पद्दुचेरी व आंध्र प्रदेशवर मंदोस चक्रीवादळाचे संकट घोंगावत आहे. त्यामुळे या राज्यांना हवामान खात्याने रेड अर्लट दिला आहे. तसेच महाराष्ट्र व गुजरातमध्येही पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

मंदोस वादळामुळे समुद्र किनाऱ्यांवर वादळी वाऱ्यांसह मुसळधार पाऊस पडत आहे. त्यामुळे स्थानिक प्रशासन सर्तक झाले आहे. सुरक्षेचा उपाय म्हणून येथे एनडीआरएफचे व एसडीआरएफचे पथक दाखल झाले आहे. ४०० जणांच्या १२ तुकड्या येथे तैनात करण्यात आल्या आहेत. सुरक्षेसाठी तामिळनाडुमध्ये शाळा व महाविद्यालयांना सुट्टी देण्यात आली आहे. या वादळामुळे कर्नाटक व केरळमधील हवामानात बदल झाला आहे. मंदोस वादळाचा फटका दक्षिण भारतातील राज्यांना बसणार आहे. महाराष्ट्र व गुजरातमध्येही पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

बंगालच्या उपसागरात दक्षिण-पश्चिम भागामध्ये दोन दिवसांपासून कमी दाबाचे क्षेत्र निर्माण होत होते. तसेच त्याची तीव्रता सातत्याने वाढत गेली. याचे चक्रीवादळात रुपांतर झाले. चेन्नई शहरापासून हे चक्रीवादळ ७०० किमी अंतरावर होते. चक्रीवादळाचा परिणाम ११ डिसेंबरपर्यंत राहणार असून ९ डिसेंबरला दक्षिणेकडे अतिवृष्टीचा इशारा देण्यात आला आहे.

त्यामुळे महाराष्ट्रातील दक्षिणेकडील अनेक भागात हलक्या पावसाची शक्यता आहे. दक्षिण कोकण, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. गेल्या वर्षी आलेल्या तौक्ते वादळाने गुजरातचे मोठे नुकसान केले. महाराष्ट्राला याचा फटका बसला नाही. तौक्ते चक्रीवादळाचा तडाखा हा महाराष्ट्राला बसणार नाही, असे प्रादेशिक हवामान केंद्राने स्पष्ट केले होते. महाराष्ट्रापासून ३५० किमी दूर या चक्रीवादळाचा परिणाम असेल त्यामुळे याचा थेट परिणाम हा महाराष्ट्रात होणार नाही.

# लावणी सम्राज्ञी सुलोचना चव्हाण यांचे निधन..

मराठी मनोरंजन विश्वासाठी अत्यंत धक्कादायक बातमी समोर आली आहे. साठ वर्षांहून अधिक काळ आपल्या गायनाने रसिकांच्या मनावर अधिराज्य करणाऱ्या महाराष्ट्राच्या लावणीसम्राज्ञी ज्येष्ठ पार्श्वगायिका सुलोचना चव्हाण यांचे आज शनिवारी 10 डिसेंबर रोजी निधन झाले आहे.

सोळावं वरीस धोक्याचं.. उसाला लागलं कोल्हा.. आंबा आलाय पाडला, पावणा ;पुण्याचा आलाय गं.. अशा शेकडो लावण्या ज्यांनी अजरामर केल्या असा संगीत क्षेत्रातला बुलंद आवाज आज हरपला. काही महिन्यांपूर्वीच त्यांना भारत सरकारच्या 'पद्मश्री' पुरस्काराने सन्मानित करण्यात आलं होतं. त्यावेळीच त्यांची प्रकृती काहीशी ठीक नसल्याने त्यांना व्हील चेअर वरून आणण्यात आले होते.

काही महिन्यांपूर्वी त्या घरात पडल्या होत्या. त्यांच्या कमरेचं हाड मोडलं होतं. त्यांच्यावर शस्त्रक्रियाही करण्यात आली होती. पण त्याला फारसा सकारात्मक प्रतिसाद न मिळाल्याने त्या



तेव्हापासून एकाच जागेवर होत्या. शिवाय वयामुळेही प्रकृती खालावली होती. गेल्या काही दिवसात त्यांची प्रकृती अहडीक चिंताजनक होती. त्यांच्या स्मृतीही कमजोर होत होत्या. त्यावर इलाज नसल्याचे डॉक्टरांनी सांगितल्याने त्या घरीच होत्या. अखेरी शनिवारी गीरगाव येतील राहत्या घरीच त्यांचे निधन झाले. अशी माहिती त्यांचा मुलगा विजय चव्हाण यांनी दिली.

# ‘इंडियन आयडॉल 13’ मध्ये हेमा मालिनींची उपस्थिती



सोनी एन्टरटेन्मेंट टेलिव्हिजनवरील इंडियन आयडॉल सत्र 13 मध्ये ‘ड्रीम गर्ल’ विशेष भाग सादर होणार आहे, ज्या भागात खुद्द ड्रीम गर्ल हेमा मालिनी आपली मुलगी ईशा देओल हिच्या समवेत उपस्थित राहणार आहे. परीक्षक विशाल दादलानी, नेहा कक्कड आणि हिमेश रेशमिया यांच्या समक्ष आपले 11 सर्वोत्तम स्पर्धक एकापेक्षा एक सरस परफॉर्मन्स देताना दिसतील. कोलकाताहून आलेली सोनाक्षी कर किनारा (1977) चित्रपटातील ‘नाम गुम जाएगा’ हे गाणे सादर करणार आहे,जे ऐकून सर्व परीक्षक आणि आमंत्रित पाहुणी हेमा मालिनी देखील थक्क झालेली दिसेल.


या परफॉर्मन्सनंतर सोनाक्षीच्या आवाजाचे कौतुक करून हेमा मालिनीने या गाण्याच्या चित्रीकरणाच्या वेळेसच्या आठवणी सांगितल्या. हेमा मालिनी म्हणाली, “सोनाक्षी, लता जींचे गाणे म्हणणे ही काही सोपी गोष्ट नाही. हे गाणे तू ज्या सहजतेने म्हटलेस, त्याबद्दल मी तुझे कौतुक करते. खूप छान.लता जी आपल्या सर्वांसाठी मा सरस्वती आहेत. हे गाणे गुलझार साहब यांनी कथानकास अनुरूप जरी लिहिले असले, तरी ते लताजींसाठीच रचलेले गाणे आहे! मी भाग्यवान आहे की, मला ते गाणे मिळाले आणि त्यावर परफॉर्म करता आले.




# बालवीर चालला चंद्रावर; टीव्हीवर नाही, प्रत्यक्षात!

जपानचे उद्योगपती युसाकू मेझावा यांनी नुकतंच चंद्राच्या सफरीची घोषणा केली आहे. या सहलीसाठी काही जणांना निवडण्यात आलं आहे. यामध्ये काही युट्यूबर्स तसंच अभिनेत्यांचा समावेश आहे. विशेष म्हणजे भारतातला एक प्रसिद्ध आणि लोकप्रिय चेहराही या सहलीला जाणार आहे. पुढच्या वर्षी चंद्रावर सहल जाणार आहे, इलॉन मस्कच्या स्पेस एक्स रॉकेट्समधून हे सगळे चंद्रावर जाणार आहेत. यामध्ये आठ जणांचा समावेश आहे. अमेरिकेतून डीजे आणि निर्माता स्टीव्ह ऑकी, अमेरिकन युट्युबर टीम डॉड, झेक आर्टिस्ट येमी एडी, आयर्लंडची फोटोग्राफर रिहाना ॲडम, ब्रिटीश फोटोग्राफर करिम लिया, अमेरिकन फिल्ममेकर ब्रेंडन हॉल आणि भारतीय अभिनेता देव जोशी तसंच साऊथ कोरियातला संगीतकार टॉप याचा समावेश आहे. चंद्रावर सहलीसाठी निवड करण्यात आलेल्या या भारतीय अभिनेत्याचं नाव आहे देव जोशी. देव जोशीला घराघरात बालवीर या नावाने ओळखलं जातं. याच नावाच्या मालिकेतून तो लोकप्रिय झाला होता. लहान मुलांमध्ये त्याची प्रचंड क्रेझ आहे. देवने २०हून अधिक गुजराती चित्रपटांमध्ये काम केलं आहे. त्याने चंद्रशेखर या मालिकेमध्ये चंद्रशेखर आझाद यांची भूमिका साकारली होती. मेझावा यांनी या प्रवासासाठी स्पेस एक्सच्या रॉकेटमधली प्रत्येक जागा खरेदी केली आहे. हे रॉकेट २०१८ पासून कार्यरत आहे. मेझावा यांनी ट्वीटरवरुन याची घोषणा केली असून त्यांच्या #DEARMOON प्रोजेक्टसाठी करण्यात आलेल्या वेबसाईटवरुनही त्यांनी हे सांगितलं आहे. स्पेस एक्सच्या स्टारशिपला लॉंच झाल्यापासून पृथ्वीवर परतण्यासाठी आठ दिवस लागतील. हे यान चंद्राच्या तीन फेऱ्या पूर्ण करेल. २०२३ मध्ये या फेरीचं नियोजन करण्यात आलं आहे, पण या यानाच्या चाचण्या होत असल्याने नियोजनात बदल होऊ शकतो.

# अशोक सराफ यांच्या एका सल्ल्याने बदललं सायली संजीवचे आयुष्य!



मराठी चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय अभिनेत्री म्हणून सायली संजीवला ओळखले जाते. सध्या ती तिच्या ‘गोष्ट एका पैठणीची’ या चित्रपटामुळे चर्चेत आहे. काही दिवसांपूर्वीच हा चित्रपट प्रदर्शित झाला. या चित्रपटाला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळताना दिसत आहे. या चित्रपटाच्या निमित्ताने सायली संजीवने तिच्या यशस्वी करिअरबद्दल सांगितले. यावेळी तिने तिच्या आयुष्यात महत्त्वाच्या असलेल्या दोन व्यक्तींबद्दल सांगितले.

गोष्ट एका पैठणीची हा चित्रपटामुळे सायली संजीव ही सध्या सातत्याने चर्चेत आहे. या चित्रपटात सायली ही मुख्य भूमिकेत झळकताना दिसत आहे. या चित्रपटाच्या निमित्ताने सायलीने ‘महाराष्ट्र टाईम्स’ला मुलाखत दिली. या मुलाखतीत तिने तिच्या यशस्वी होण्यामागे दोन महत्त्वाच्या व्यक्ती असल्याचं सांगितले. हे दोन व्यक्ती म्हणजे एक तिचे वडील संजीव आणि दुसरे म्हणजे ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ. सायली संजीव ही अशोक सराफ यांना वडिलांच्या समान मानते. या मुलाखतीत सायलीने त्या दोघांचा अतिशय कृतज्ञतापूर्वक उल्लेख केला.

# दीपिका पादुकोण साकारणार ‘लेडी सिंघम’ची भूमिका

बॉलिवूड अभिनेत्री दीपिका पादुकोणने आपल्या अभिनयाची छाप फक्त बॉलिवूडमध्येच नाही तर हॉलिवूडमध्ये देखील उमटवली आहे. सध्या दीपिकाचं नाव बॉलिवूडमधील टॉप अभिनेत्रींमध्ये घेतलं जातं. आगामी काळात दीपिकाचे बरेच चित्रपट प्रदर्शित होणार आहेत. सध्या दीपिका त्याच चित्रपटांच्या शूटिंगमध्ये व्यस्त आहे. दरम्यान, आता दीपिकाच्या हाती आणखी एक चित्रपट लागला आहे. लव्ह स्टोरी आणि रोमॅंटिक चित्रपट



तयार करणारी दीपिका आता लवकरच ॲक्शन देखील करताना दिसत आहे. मीडिया रिपोर्ट्सनुसार, दीपिका पादुकोण लवकरच प्रसिद्ध चित्रपट दिग्दर्शक रोहित शेट्टीच्या आगामी ‘सिंघम अगेन’ चित्रपटामध्ये दिसणार आहे. रोहित शेट्टीच्या या चित्रपटामध्ये दीपिका लेडी सिंघमची भूमिका साकारणार आहे. नुकत्याच काही दिवसांपूर्वी सिंघम फ्रेंचायजीच्या तिसऱ्या चित्रपटाची घोषणा करण्यात आली होती.

# भारताची बांगलादेशवर मात

## इशान किशनचा द्विशतकी झंझावात

**। चट्टोग्राम ।**
**महाईन्यूज । वृत्तसंस्था**

डावखुऱ्या इशान किशनचा विक्रमी द्विशतकी झंझावात आणि विराट कोहलीने साकालेल्या शतकाच्या बळावर भारताने तिसऱ्या एकदिवसीय क्रिकेट सामन्यात बांगलादेशचा २२७ धावांनी धुव्वा उडवला. मात्र, भारताने ही मालिका १-२ अशा फरकाने गमावली. या सामन्यात भारताने प्रथम फलंदाजी करताना ८ बाद ४०९ अशी धावसंख्या उभारली. किशनने सलामीला येताना १३१ चेंडूंत २४ चौकार व १० षटकारांची आतषबाजी करत २१० धावांची खेळी केली. एकदिवसीय क्रिकेटमध्ये द्विशतक करणारा किशन हा भारताचा चौथा फलंदाज ठरला. किशनने एकदिवसीय क्रिकेटमध्ये सर्वात जलद द्विशतकाचा (१२६ चेंडू) विक्रम आपल्या नावे केला. त्याला कोहलीची उत्तम साथ लाभली.

कोहलीने एकदिवसीय क्रिकेटमधील जवळपास तीन वर्षांपासूनचा शतकाचा दुष्काळ संपवताना ९१ चेंडूंत ११ चौकार व दोन षटकारांसह ११३ धावा केल्या. या दोघांनी दुसऱ्या गड्यासाठी २९० धावांची भागीदारी रचली. प्रत्युत्तरात बांगलादेशचा डाव १८२ धावांत




### संक्षिप्त धावफलक

**भारत : ५० षटकांत ८ बाद ४०९ (इशान किशन २१०, विराट कोहली ११३; शाकिब अल हसन २/६८) विजयी वि. बांगलादेश : ३४ षटकांत सर्वबाद १८२ (शाकिब अल हसन ४३, लिटन दास २९; शार्दूल ठाकूर ३/३०, अक्षर पटेल २/२२)**


**२१० इशान किशन चेंडू १३१, चौकार २४, षटकार १०**

आटोपला. भारताकडून शार्दूल ठाकूर (३/३०), अक्षर पटेल (२/२२) आणि उमरान मलिक (२/४३) यांनी भेदक मारा केला. तत्पूर्वी, भारताच्या डावाची सुरुवात अडखळती झाली. शिखर धवनला (३) मेहदी हसनने लवकर बाद केले. यानंतर मात्र किशन-कोहली जोडीपुढे बांगलादेशचे गोलंदाज निष्प्रभ ठरले. किशनने आक्रमक शैलीत फलंदाजी करताना ४९ चेंडूंत अर्धशतक, ८५ चेंडूंत शतक पूर्ण केले. मग त्याने धावांची गती अधिकच वाढवली. त्याने पुढील १०० धावा केवळ ४१ चेंडूंत केल्या. दुसरीकडे कोहलीने ८५ चेंडूत शतक झळकावले. हे दोघे बाद झाल्यावर मधली फळी अपयशी ठरली. मात्र, वॉशिंग्टन सुंदरने (२७ चेंडूंत ३७) फटकेबाजी केल्याने भारताला ४०० धावांचा टप्पा ओलांडता आला. ४१० धावांचा पाठलाग करताना बांगलादेशच्या फलंदाजांनी आक्रमक खेळ करण्याचा प्रयत्न केला. याच प्रयत्नात त्यांनी ठरावीक अंतराने गडी गमावले. अखेर बांगलादेशचा डाव १८२ धावांतच आटोपला.

# कतारमध्ये अमेरिकन पत्रकाराचा मृत्यू!

## फिफा वर्ल्ड कप वादाच्या भोवऱ्यात

**नवी दिल्ली ।**
**महाईन्यूज । वृत्तसंस्था**



फिफा विश्वचषक 2022 पुन्हा एकदा वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. विविध कारणांमुळे ही स्पर्धा उद्‌घाटनापूर्वीच वादाच्या भोवऱ्यात सापडली होती. कतारमधील समलैंगिकतेबाबत कठोर कायदे हा त्यापैकीच एक आहे. याच कारणामुळे पुन्हा एकदा कतार आणि फिफा विश्वचषक वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे.

कतारमध्ये एका अमेरिकन पत्रकाराचा मृत्यू झाला आहे. ग्रँट वहल असे या पत्रकाराचे नाव आहे. ग्रँट हा तोच पत्रकार आहे ज्याने काही दिवसांपूर्वी वृत्त दिले होते की समलिंगी समुदायाचे समर्थन करणारा शर्ट परिधान केल्याबद्दल त्याला कतारमध्ये ताब्यात घेण्यात आले होते.

या घटनेनंतर काही दिवसांनी त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्या मृत्यूचे अनेक अर्थ काढले जात आहेत. त्याचवेळी त्यांना मोठा धक्का बसल्याचे त्यांच्या पत्नीचे म्हणणे आहे. ग्रँटचा मृत्यू कसा झाला हे अद्याप समोर आलेले नाही. इंग्लंडचा स्टार खेळाडू डेव्हिड बेकहॅम अमेरिकेत स्टार बनण्यावर ग्रँटने पुस्तक लिहिले आणि ते पुस्तक खूप गाजले होते.

फिफा विश्वचषकाचे कव्हर करताना ग्रँटने सांगितले की, यूएस संघाच्या वेल्सविरुद्धच्या सामन्यादरम्यान त्याला स्टेडियममध्ये प्रवेश दिला गेला नाही कारण त्याच्या शर्टवर फुटबॉल काढलेला होता आणि त्याच्याभोवती इंद्रधनुष्याचे रंग होते.

# मेस्सीने रचला इतिहास

## पेनल्टी शूटआऊटमध्ये नेदरलँडचा पराभव करत अर्जेंटिना उपांत्य फेरीत

**नवी दिल्ली ।**
**महाईन्यूज । वृत्तसंस्था**



कतार फिफा विश्वचषक २०२२ स्पर्धेचा थरार अंतिम टप्प्यात पोहोचला आहे. शुक्रवारी रात्री उशिरा दुसरा उपांत्यपूर्व सामना अतिशय रोमांचक झाला. या सामन्यात लिओनेल मेस्सीचा संघ अर्जेंटिना नेदरलँडशी भिडला. ज्यामध्ये अर्जेंटिनाने पेनल्टी शूटआऊटमध्ये ४-३ असा विजय मिळवत उपांत्य फेरीत प्रवेश केला.

आता मेस्सीचा संघ यावेळी चॅम्पियन होण्यापासून दोन विजय दूर आहे. अर्जेंटिना संघ आता उपांत्य फेरीत क्रोएशियाशी भिडणार आहे. क्रोएशियाने उपांत्यपूर्व फेरीच्या सामन्यात नेमारचा संघ ब्राझीलचा पेनल्टी शूटआऊटमध्ये पराभव केला. आता अर्जेंटिना आणि क्रोएशिया यांच्यातील हा उपांत्य सामना १३ डिसेंबर रोजी उशिरा रात्री साडेबारा वाजता होणार आहे.

**नेदरलँड्सने असे केले होते दमदार पुनरागमन –**

उत्तरार्धात हा सामना खूपच रोमांचक झाला. नेदरलँड संघाने ८३व्या मिनिटाला पहिला गोल करून सामना २-१ केला होता. बाउट बेघोर्स्टने सर्जिओ बर्घोसजवळ हेडरद्वारे हा गोल केला. यानंतर निर्धारित ९० मिनिटांनंतर अर्जेंटिनाने २-१ ने सामना आपल्या ताब्यात ठेवला. त्यानंतर इंज्युरी टाईमच्या जवळपास शेवटच्या मिनिटात नेदरलँड्सने दुसरा गोल करत सामना २-२ असा बरोबरीत आणला. हा गोलही बेघोर्स्टने ९०व्या + ११व्या मिनिटाला केला. यानंतर अतिरिक्त वेळेतही सामन्याचा निकाल लागला नाही. यानंतर पेनल्टी शूटआऊटमध्ये अर्जेंटिनाने हा सामना ४-३ अशा फरकाने जिंकला.

# मोरोक्कोचा पोर्तुगालला दे धक्का!

## उपांत्य फेरीत जाणारा ठरला पहिला आफ्रिकन संघ, रोनाल्डोचे स्वप्न भंगले

**नवी दिल्ली ।**
**महाईन्यूज । वृत्तसंस्था**



फिफा विश्वचषक स्पर्धेच्या तिसऱ्या उपांत्यपूर्व फेरीत मोरोक्कोने पोर्तुगालचा १-० असा पराभव करून मोठा अपसेट केला. मोरक्कन संघाने आतापर्यंतच्या विश्वचषकात मोठा इतिहास रचला आहे. हा संघ उपांत्य फेरी गाठणारा पहिला आफ्रिकन संघ ठरला आहे. यापूर्वी कोणताही आफ्रिकन देश फिफा विश्वचषकाच्या उपांत्य फेरीपर्यंत पोहोचला नव्हता. अल थुमामा स्टेडियमवर झालेल्या सामन्यात मोरोक्कोने पोर्तुगालचा १-० असा पराभव केला. या पराभवासह पोर्तुगाल आणि ख्रिस्तियानो रोनाल्डोची मोहीम येथेच संपुष्टात आली.

सामन्यात सुरुवातीपासूनच पोर्तुगाल आणि मोरोक्को यांच्यात चुरशीची स्पर्धा होती. चेंडूवर ताबा मिळवणे असो की गोलचे प्रयत्न, प्रत्येक बाबतीत दोन्ही संघ एकमेकांवर वर्चस्व गाजवताना दिसत होते. पण सामन्यातील पहिला गोल युसूफ एन नेसरीने ४२व्या मिनिटाला केला. या लक्ष्याला याह्या अतियात-अल्लाह यांनी मदत केली. या गोलच्या जोरावर मोरोक्कोने सामना जिंकला. हाफ टाईमला मोरोक्कोने पोर्तुगालवर १-० अशी आघाडी घेत इतिहास रचला. एन नेसरीने ४२व्या मिनिटाला हेडर मारून संघाला चांगली सुरुवात करून दिली. आता सामन्यात पुनरागमन करण्यासाठी पोर्तुगालला बरोबरी साधावी लागणार आहे. हाफटाइमपर्यंत पोर्तुगालने पाच शॉट्स मारण्याचा प्रयत्न केला. यापैकी एकच टार्गेट होता. तर, मोरोक्कोने सात शॉट्सचा प्रयत्न केला. यापैकी दोन जण टार्गेटवर होते. चेंडूवर ताबा मिळवण्याच्या बाबतीत पोर्तुगीज संघ पुढे राहिला. पोर्तुगालचा चेंडूवर ताबा ६६ टक्के आणि मोरोक्कोचा ३४ टक्के होता. पोर्तुगाल संघाने ख्रिस्तियानो रोनाल्डोला सुरुवातीच्या फळीत स्थान दिलेले नाही. मोरोक्को विरुद्ध पोर्तुगालच्या सुरुवातीच्या फळीचे सरासरी वय २६ वर्षे 332 दिवस आहे, जे विश्वचषकात मैदानात उतरलेले त्यांचे सर्वात तरुण आहे.